**ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घेण्यात येणा-या तात्पुरत्या पुरक नळ योजनांना प्रशासकिय मान्यता देण्याच्या आर्थिक मर्यादेत वाढ करणेबाबत ..**

**महाराष्ट्र शासन,**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग ,**
**शासन निर्णय क्र. टंचाई -१००२/प्र.क्र. १६५/पापु-१४**
**मंत्रालय , मुंबई-४०००३२,**
**दिनांक:- २ मे २००२.**

**वाचा : १.** महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग , शासन निर्णय क्र. टंचाई-३०९९/प्र. क्र. १२/ पापु-१४, दिनांक ३ फेब्रुवारी , १९९९.

**प्रस्तावना:**

संदर्भाधीन दिनांक ३ फेब्रुवारी, १९९९ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची टंचाई परिस्थिती निवारणार्थ घ्यावयाच्या उपाययोनांबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. ग्रामीण भागात पाणीटंचाई निवारणार्थ घेण्यात येणा-या उपाययोजनांमधील "तात्पुरत्या पूरक नळ योजना" ही एक उपाययोजना आहे. तात्पुरती पूरक नळ योजनांना मंजुरी देण्याचे अधिकार विहित करण्यात आलेले असून, त्यानुसार अंदाजित किंमत रु. ५ लाखापर्यतच्या योजनांना प्रशासकिय मंजुंरी देण्याचे अधिकार जिल्हाधिका-यांना तर ५ लाखापेक्षा जास्त किंमतीच्या योजनांना मंजूरी देण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांना प्रदान करण्यात आलेले आहेत. सदर अधिकार हे एप्रिल १९९४ मध्ये प्रदान करण्यात आलेले आहेत. दरम्यानच्या कालावधीत योजनांच्या किंमतीत झालेली वाढ लक्षात घेता तसेच तात्पुरत्या पूरक नळ योजनांना जिल्हा स्तरावर मंजूरी मिळून त्या तातडीने कार्यान्वित व्हाव्यात यासाठी जिल्हयाधिका-यांना तात्पुरत्या पूरक नळ योजना मंजूर करण्यासाठी प्रदान करण्यात आलेली रु. ५ लाखापर्यतची मर्यादा वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती लक्षात घेऊन ग्रामीण भागात पाणी टंचाई कार्यक्रमाअंतर्गत तात्पुरत्या पूरक नळ योजनांना मंजूरी देण्यासाठी संदर्भाधीन शासन निर्णयातील परिच्छेद (III) (५) (II) नुसार अंदाजित किंमत रु. ५ लाखापर्यतच्या योजनांना प्रशासकिय मंजूरी देण्याचे जिल्हयाधिका-यांना



४९५

असलेले अधिकार रु. १० लाखापर्यंत वाढविण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे. रु. १० लाखापेक्षा जास्त अंदाजित किंमतीच्या तात्पुरत्या पूरक नळ योजनांना प्रशासकिय मंजूरी देण्याचे अधिकार विभागीय आयुक्त यांना राहतील. सदर अधिकार हे तात्पुरत्या पूरक नळ योजनांसाठी विहीत करण्यात आलेल्या इतर अटींना अधीन राहून प्रदान करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**(रु. न. देशमुख)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,

सर्व विभागीय आयुक्त ,

सर्व जिल्हाधिकारी , (मुंबई व बृहन मुंबई जिल्हा वगळून)

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद

कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग , जिल्हा परिषद (सर्व)

सदस्य सचिव , महाराष्ट्र जीवन प्राधिकारण , मुंबई (प्रशासन/तांत्रिक)

संचालक , भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा , पुणे,

मुख्य अभियंता , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण , (सर्व)

जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी (सर्व)

खाजगी सचिव, (सर्व मंत्री / राज्यमंत्री)

सर्व मंत्रालयीन विभाग,

सर्व अधिकारी , पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.

पापु-१४ संग्रहासाठी



४८६